जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१४/०१/२०२४
## दि.१३/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे २०/२०२४,भादविक ३२४,५०४,५०६,४२७,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २२ वर्षे,रा.जय जवान नगर,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम व त्यांचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०१/२०२४ रोजी दुपारी १५/०० वा.संगमवाडी पार्कींग नं.०३,येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मोटार सायकलवरून जात असतांना नमुद ठिकाणी आले असता त्यांचे पाठीमागून आलेल्या मोटार सायकलवरून इसमांनी फिर्यादी यांचे पाठीमागे बसलेला त्यांचा अल्पवयीन मित्र,वय-१७ वर्षे यास त्याचे हातातील धारधार शस्त्राने त्याचे मानेवर मारून त्यांना दुखापत केली आहे. तसेच मोटार सायकलचे हेड लाईट व पुढील बाजुस धारधार शस्त्राने मारून वाहनाचे नुकसान करून,त्यांना शिवीगाळ करून,आज यांना सोडणार नाही अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, शरद झांजरे ९५५२५३५६७३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३७/२०२४,भादविक ३२४,३२३,५०६ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२० वर्षे,रा.ॲथोननगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०१/२०२४ रोजी १७/३० वा.ॲथोननगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे आय.टी इंजिनिअरिंगचे पाहिल्या वर्षात शिक्षण घेत असुन,त्यांचे रूम पार्टनर सहकारी मित्र यातील नमुद इसम हा देखील इंजिनिअरिंगचे पाहिल्या वर्षात शिक्षण घेत आहे. त्याची इंजिनिअरिंग ग्राफीक्सची परिक्षा ही वेळापत्रकनुसार दिनांक १२/०१/२०२४ रोजी असल्याने त्याने त्याचे नावे फिर्यादी यांना डमी म्हणुन परिक्षेस बसणेसाठी सांगुन,तु जर माझ्या परिक्षेस डमी म्हणुन नाही बसला तर मी तुला मारहाण करीन अशी धमकी दिली. त्यावेळी सदर इसम हा फिर्यादी यांना फोर्स करीत असताना,फिर्यादी यांनी त्यास नकार दिल्याचे कारणावरून,त्याने फिर्यादी यांना रूमवर नेवुन,मारहाण करून,त्याचे कमरेस असलेल्या पट्टयाने पाठीवर,मानेवर मारहाण करून दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बालाजी डिगोळे ८१०८४३१११५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**